## ७५ टक्के जनतेला अन्न सुरक्षा कायद्याचे छत्र

# राष्ट्रीय सल्लागार परिषद आपल्या भूमिकेवर ठाम

नवी दिल्ली : गिरीश अवघडे

पंतप्रधानांच्याअर्थविषयकसमितीने काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या अन्न सुरक्षा विधेयकातील शिफारशी फेटाळल्या असल्या तरी परिषदेने आपल्या भूमिकेवर ठाम राहत या विधेयकाच्या मसूद्याचा पहिला भाग सार्वजनिक केला. या मसूद्यात देशातील ७५ टक्के जनतेला अन्न सुरक्षा विधेयकाच्या छत्राखाली आणण्याचे नमूद करण्यात आले असून त्याचा पुर्ण मसूदा लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे योजना आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी सांगितले.

राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या आज झालेल्या बैठकीत विधेयकाचा मसूदा संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे ठरविण्यात आल्याचे जाधव यांनी सांगितले. ते म्हणाले की, अन्न सुरक्षा विधेयकाच्या मसूद्याबाबत आम्ही आज तीनमहत्त्वाचेनिर्णयघेतलेयातलापहिला निर्णय म्हणजे मसूदा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे. दुसरा या मसूद्यासोबत स्पष्टीकरणार्थ टीपण जोडणे आणि तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे उच्च प्राथमिकता गट निश्चित करून त्यात अनुसूचित जाती आणि जमातींचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही शिफारस आम्ही ग्रामविकास मंत्रालयाकडे केली असल्याची माहितीही नरेंद्र जाधव यांनी दिली. राष्ट्रीय सल्लागार परिषदेने अन्न सुरक्षा विधेयकात ७५ टक्के जनतेला स्वस्त दरात धान्य पुरविण्याची मुख्य शिफारस केली आहे. ही शिफारस अव्यवहार्य असल्याचे पंतप्रधानांच्या सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखालील अर्थविषयक समितीने स्पष्ट करून ही शिफारस फेटाळली होती. केवळ अत्याधिक गरजू लोकांनाच या कायद्याच्या छत्राखाली आणावे असेही रंगराजन समितीने सुचविले होते. परंतु राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या आजच्या बैठकीत पुर्वीच्याच मसूद्यावर ठाम राहत तो २६ फेब्रुवारीच्या आसपास संकेतस्थळार प्रसिद्ध करण्याचे ठरविण्यात आले आहे.

सकाळ पुणे, शनिवार, २२ जानेवारी २०११

# अध्यक्षपदी डॉ. नरेंद्र जाधव



नवी दिल्ली, ता. २१ : पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी १९४८ च्या फॅक्टरी कायद्यात सुधारणा सुचविण्यासाठी नेमलेल्या विशेषाधिकार समितीचे अध्यक्षपद योजना आयोगाचे सदस्य व अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्याकडे सोपविले आहे. अर्थमंत्र्यांचे सल्लागार असलेले कौशिक बसू त्याचे सदस्य आहेत. डॉ. जाधव या कायद्यातील सुधारणांबाबतचा अहवाल चार आठवड्यांत सादर करणार आहेत.

# कौशल्य संवर्धनाची गरज- नरेंद्र जाधव

मुंबई, दि. २० - भारताच्या सध्याच्या वाढीचा दर पाहता, दोन अंकी वाढीच्या वरच्या स्तरात देशाला घेऊन जाण्यासाठी तो पुरेसा आहे. मात्र, राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे (नॅशनल ॲडव्हायजरी काउन्सिल-एनएसी) आणि नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले की, देशाला शैक्षणिक आणि कौशल्य संवर्धन कार्यक्रमांच्या गुणवत्तेत वाढ करण्याची व त्याचबरोबर तळागाळाला सामावून घेण्याची आवश्यकता आहे.



अन्यथा विकासदर टिकणार नाही. 'लोकसंख्या वाढ-फायदा की संकट' या विषयावर ७ वे एच. एम. त्रिवेदी स्मृति व्याख्यान १७ जानेवारी रोजी इंडियन मर्चन्ट चेम्बर येथे देताना डॉ. नरेंद्र जाधव बोलत होते.

आयएमसीचे अध्यक्ष दिलीप दांडेकर म्हणाले की, भारत सध्या एका नव्या युगाच्या उंबरठ्यावर उभा आहे, कारण देशाच्या १.१ अब्ज लोकसंख्येपैकी ५१ टक्के लोक वय वर्षे २५ च्या आतील आणि दोन तृतीयांश लोक ३५ पेक्षा कमी वयाचे आहेत. अशा थक्क करणाऱ्या प्रमाणामुळे भारताला एक विशेष फायदा मिळत आहे.

दांडेकरांनी मांडलेल्या निरीक्षणांशी सहमती दर्शवत डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले की, या मोठ्या आव्हानांबाबत पंतप्रधान पूर्णपणे जागरुक आहेत आणि सरकारी यंत्रणेचे सर्व विभाग त्यांचा परिणामकारकरीत्या मुकाबला करण्यासाठी सज्ज होत आहेत. पंतप्रधानांच्या थेट मार्गदर्शनाखाली सरकारने परिस्थिती सुधारण्यासाठी काही मोठी पावले उचलली आहेत.

लोकमत 21/1/11.

पुणे शहर ६ पुढारी | पुणे, शनिवार २२ जानेवारी २०११

### ७५ टक्के जनतेला अन्न सुरक्षा कायद्याचे छत्र

# राष्ट्रीय सल्लागार परिषद आपल्या भूमिकेवर ठाम

नवी दिल्ली : गिरीश अवघडे

पंतप्रधानांच्याअर्थविषयकसमितीने काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या अन्न सुरक्षा विधेयकातील शिफारशी फेटाळल्या असल्या तरी परिषदेने आपल्या भूमिकेवर ठाम राहत या विधेयकाच्या मसूद्याचा पहिला भाग सार्वजनिक केला. या मसूद्यात देशातील ७५ टक्के जनतेला अन्न सुरक्षा विधेयकाच्या छत्राखाली आणण्याचे नमूद करण्यात आले असून त्याचा पुर्ण मसूदा लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे योजना आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी सांगितले.

राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या आज झालेल्या बैठकीत विधेयकाचा मसूदा संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे ठरविण्यात आल्याचे जाधव यांनी सांगितले. ते म्हणाले की, अन्न सुरक्षा विधेयकाच्या मसूद्याबाबत आम्ही आज तीनमहत्त्वाचे निर्णय घेतले यातला पहिला निर्णय म्हणजे मसूदा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे. दुसरा या मसूद्यासोबत स्पष्टीकरणार्थ टीपण जोडणे आणि तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे उच्च प्राथमिकता गट निश्चित करून त्यात अनुसूचित जाती आणि जमातींचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही शिफारस आम्ही ग्रामविकास मंत्रालयाकडे केली असल्याची माहितीही नरेंद्र जाधव यांनी दिली. राष्ट्रीय सल्लागार परिषदेने अन्न सुरक्षा विधेयकात ७५ टक्के जनतेला स्वस्त दरात धान्य पुरविण्याची मुख्य शिफारस केली आहे. ही शिफारस अव्यवहार्य असल्याचे पंतप्रधानांच्या सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखालील अर्थविषयक समितीने स्पष्ट करून ही शिफारस फेटाळली होती. केवळ अत्याधिक गरजू लोकांनाच या कायद्याच्या छत्राखाली आणावे असेही रंगराजन समितीने सुचविले होते. परंतु राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या आजच्या बैठकीत पुर्वीच्याच मसूद्यावर ठाम राहत तो २६ फेब्रुवारीच्या आसपास संकेतस्थळार प्रसिद्ध करण्याचे ठरविण्यात आले आहे.

सकाळ पुणे, शनिवार, २२ जानेवारी २०११

## अध्यक्षपदी डॉ. नरेंद्र जाधव



नवी दिल्ली, ता. २१ : पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी १९४८ च्या फॅक्टरी कायद्यात सुधारणा सुचविण्यासाठी नेमलेल्या विशेषाधिकार समितीचे अध्यक्षपद योजना आयोगाचे सदस्य व अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्याकडे सोपविले आहे. अर्थमंत्र्यांचे सल्लागार असलेले कौशिक बसू त्याचे सदस्य आहेत. डॉ. जाधव या कायद्यातील सुधारणांबाबतचा अहवाल चार आठवड्यांत सादर करणार आहेत.